# मराठी विज्ञान परिषद

# घटना नियम

**(1 सप्टेंबर, 2016पासून)**

विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई 400 022.
दूरध्वनी क्र. 91-22-2405 4714, 2405 7268
इ-मेल : office@mavipamumbai.org
संकेत स्थळ : www.mavipa.org

मराठी विज्ञान परिषदेची स्थापना दिनांक 24 एप्रिल, 1966 रोजी मुंबई येथे एका प्रकट सभेत करण्यात आली. परिषदेचे घटना नियम ठरविण्यासाठी या प्रकट सभेने एक समिती नेमली व या समितीने दिनांक 17 जून, 1966 रोजी घटना नियम संमत केले. संस्था नोंदणी अधिनियम, 1860 नुसार BOM.81/66/GBBSD या क्रमांकाने दिनांक 12 ऑगस्ट, 1966 रोजी आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1950 नुसार F-1429 (BOM) या क्रमांकाने दिनांक 6 सप्टेंबर, 1966 रोजी परिषद नोंदली आहे. या नियमांत 24 जून, 1973; 26 सप्टेंबर, 1976; 6 मार्च, 1983; 20 ऑगस्ट, 1995; 18 ऑगस्ट, 2002; 19 ऑगस्ट, 2007; 24 ऑगस्ट, 2008, 23 ऑगस्ट, 2015 आणि 28 ऑगस्ट, 2016रोजी दुरुस्त्या होऊन त्याप्रमाणे खाली दिलेले घटना नियम 1 सप्टेंबर, 2016पासून अमलात आले आहेत.

## नियम

**नाव**

**1)** या संस्थेचे नाव **मराठी विज्ञान परिषद** असे आहे. तिचा उल्लेख **परिषद** असा पुढे केला आहे.

**कार्यालय**

**2)** परिषदेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे राहील.

**उद्देश**

**3)** परिषदेचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत :

1) विज्ञानाचा प्रसार प्रामुख्याने मराठी भाषेतून करणे.

2) विज्ञान व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समृद्ध करणे.

3) विज्ञानाचे जीवनात महत्त्व वाढवणे.

4) वैज्ञानिक संशोधन व विज्ञानाची प्रगती करणे.

**साधने**

**4)** परिषदेचे उद्देश साधण्यासाठी पुढील साधनांचा उपयोग केला जाईल.

1) व्याख्याने व चर्चा आयोजित करणे.

2) नियतकालिके व पुस्तके प्रसिद्ध करणे.

3) ग्रंथालये, वस्तुसंग्रह, प्रदर्शने, सहली, भेटी, शिबिरे इत्यादींची

योजना करणे.

4) शिक्षण देणे, परीक्षा घेणे, स्पर्धा ठेवणे.

5) चित्रपट, नाटक, आकाशवाणी, दूरदर्शन, ध्वनिमुद्रिका इत्यादी माध्यमांचा वापर करणे.

6) प्रयोगशाळा चालवणे, संशोधन करणे, सल्ला देणे.

7) ठिकठिकाणी मराठी विज्ञान अधिवेशने भरविणे.

8) मराठीतील व अन्य भाषांतील विज्ञानकार्याची माहिती संकलित करणे.

9) अनुदाने, शिष्यवृत्त्या, पारितोषिके इत्यादी देऊन प्रोत्साहन देणे.

10) शासनाशी व अन्य संस्थांशी सहकार्य करणे.

11) विज्ञानप्रेमी लोकांचे प्रतिनिधित्व करणे.

12) परिषदेसाठी निधी जमविणे व परिषदेच्या कार्यासाठी आवश्यक खर्च करणे.

13) स्थावर व जंगम मालमत्ता विकसित करणे, पुनर्विकसित करणे, विकत घेणे, विकणे, भाड्याने घेणे आणि देणे व तारण ठेवणे.

14) परिषदेच्या कार्यासाठी आवश्यक कर्जे व ठेवी घेणे आणि देणे.

15) परिषदेच्या उद्देशांस पोषक असे इतर योग्य उपाय योजणे.

**वर्षगणना**

**5)** परिषदेचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

**सभासदत्व**

**6)** 1) परिषदेचे घटना नियम मान्य असलेल्या व अठरा वर्षे वय पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस परिषदेचे सभासद होता येईल. परिषदेचे घटना नियम मान्य असलेल्या कोणत्याही संस्थेस परिषदेचे संस्था सभासद होता येईल.

2) व्यक्ती सभासदांचे वर्ग :

सन्मान्य सभासद घटना नियम 6 (9) नुसार नेमलेले.

उपकर्ते : रु. 25,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

आश्रयदाते : रु. 10,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

हितचिंतक : रु. 5,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

साधारण सभासद वार्षिक : रु. 100/- वर्गणी देणारे

विद्यार्थी सभासद वार्षिक : रु. 50/- वर्गणी देणारे विद्यार्थी

3) संस्था सभासदांचे वर्ग :

उपकर्ते : रु. 30,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

आश्रयदाते : रु. 15,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

हितचिंतक : रु. 10,000/- किंवा अधिक वर्गणी देणारे

साधारण सभासद : वार्षिक रु. 500/- वर्गणी देणारे

4) सभासद होऊ इच्छिणाऱ्याने कार्यकारी मंडळाकडे, मंडळाने ठरविलेल्या नमुन्यानुसार अर्ज पाठवावा व सोबत आपली वर्गणी पाठवावी. सभासदत्वासाठी वर्गणी एकरकमी द्यावी.

5) परिषदेकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार कार्यकारी मंडळ करील व मंडळाने अर्ज संमत केल्यापासून अर्जदाराला सभासदत्व प्राप्त होईल. सभासदत्वाचा अर्ज नामंजूर केल्यास त्याची कारणे दिली जाणार नाहीत. मात्र, अर्जाबरोबरची वर्गणी परत केली जाईल.

6) साधारण सभासदांनी वार्षिक वर्गणी दर वर्षी 30 एप्रिल किंवा त्यापूर्वी दिली पाहिजे. मात्र, नव्या सभासदाची पहिल्या वर्षाची वर्गणी त्याच्या अर्जाबरोबर घेतली जाईल.

7) उपकर्ते, आश्रयदाते व हितचिंतक या वर्गांतील सभासद परिषदेचे आजीव सभासद असतील.

8) कोणत्याही सभासदाचे निधन / सभासद संस्थेचे विसर्जन झाल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास किंवा त्याच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव समंत झाल्यास त्याचे सभासदत्व संपुष्टात येईल. त्याशिवाय, कोणत्याही सभासदाची वर्गणी नियमांनुसार वेळेवर न आल्यास त्यासाठी सभासदत्व मुदत वाढविण्याचा किंवा त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. सभासदत्व संपले तरी त्याच्याकडून परिषदेला जी येणी असतील, ती रद्द होणार नाहीत व सभासदत्व संपेपर्यंत दिलेली वर्गणी त्याला परत मिळणार नाही.

9) विज्ञानाची उच्च सेवा करणाऱ्या व्यक्तींना परिषदेचे सन्मान्य सभासद म्हणून नेमण्याचा कार्यकारी मंडळाला अधिकार राहील. हे सभासद आजीव सभासद मानले जातील व त्यांना वर्गणी द्यावी लागणार नाही. अशा सन्मान्य सभासदांची नेमणूक कार्यकारी

मंडळाच्या सभेत बहुमताने झाली पाहिजे. हयात असलेल्या सन्मान्य सभासदांची संख्या एका वेळी चाळीसहून अधिक असणार नाही व दरवर्षी जास्तीतजास्त पाच सन्मान्य सभासद नेमता येतील.

10) परिषदेच्या सभांत, निवडणुकीमध्ये व इतर कार्यांत भाग घेण्यासाठी प्रत्येक संस्था सभासदाला आपला एक प्रतिनिधी अधिकारपत्र देऊन पाठवता येईल.

11) सर्व वर्गाच्या व्यक्ती सभासदांना, संस्था सभासदांना समान मताधिकार राहतील.

12)सभासद ही संज्ञा व्यक्ती सभासद, सन्मान्य सभासद व संस्था सभासद यांसाठी वापरली आहे. विद्यार्थी सभासदांसाठी निराळे घटना नियम आहेत.

**सभासदाचे अधिकार**

7) **सभासदांना पुढील अधिकार राहतील :**

1) परिषदेच्या साधारण सभांमध्ये भाग घेणे व मत देणे.

2) विज्ञान अधिवेशनात अधिवेशनाच्या नियमांनुसार भाग घेणे.

3-अ) परिषदेच्या निवडणुकीस, निवडणुकीच्या नियमांनुसार उभे राहणे, मतदारांच्या याद्या बघणे व मत देणे.

3-ब) संस्था सभासद निवडणुकीस उभे राहू शकत नाहीत. संस्था सभासदत्वाचे इतर सर्व हक्क हे मात्र व्यक्ती म्हणून घेतलेल्या सभासदांसाठी असलेल्या हक्कांप्रमाणेच असतील.

4) निवडणुकीत कार्यकारी मंडळ ठरवील त्या पोटनियमांनुसार मराठी विज्ञान परिषद पत्रिका, संदर्भालय, कार्यक्रम इत्यादींचा लाभ घेणे.

**कार्यकारी मंडळ**

8) 1) परिषदेचा कारभार कार्यकारी मंडळाकडे राहील.

2) कार्यकारी मंडळात पुढीलप्रमाणे सदस्य असतील.

अ) परिषदेचे अध्यक्ष

आ) परिषदेने तीन वर्षांसाठी निवडलेले बारा सभासद

इ) परिषदेने एका वर्षांसाठी निवडलेले सभासद

ई) कार्यकारी मंडळाने पंधरापर्यंत स्वीकृत केलेले सभासद.

उ) प्रत्येक संलग्न विभागसंस्थेचा एक प्रतिनिधी.

3) परिषदेच्या अध्यक्षांची निवड दर तीन वर्षानंतर वार्षिक सभेच्या वेळी होईल. निवृत्त होणाऱ्या अध्यक्षांना निवडणुकीस पुन्हा उभे राहता येईल.

4) तीन वर्षांसाठी निवडून आलेल्या सभासदांपैकी 1/3 सभासद यथाक्रम वार्षिक सभेच्या वेळी निवृत्त होतील. एका वर्षासाठी निवडलेले सर्व सभासद वार्षिक सभेच्या वेळी निवृत्त होतील. निवृत्त होणाऱ्या सभासदांना निवडणुकीस पुन्हा उभे राहता येईल.

5) कार्यकारी मंडळाला पंधरापर्यंत सभासद स्वीकृत करता येतील. असे स्वीकृत सभासद वार्षिक सभेच्या वेळी निवृत्त होतील.

6 अ) अध्यक्षांची जागा मध्येच रिकामी झाल्यास पुढील वार्षिक सभेपर्यंत एका उपाध्यक्षाची अध्यक्ष म्हणून निवड कार्यकारी मंडळाकडून होईल. पुढील वार्षिक सभेत अध्यक्षांची तीन वर्षांसाठी निवड होईल. दरम्यानच्या काळात अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या उपाध्यक्षांची कार्यकारी मंडळावरील जागा मोकळी समजण्यात येणार नाही.

ब) कार्यकारी मंडळावर निवडून आलेल्या किंवा स्वीकृत केलेल्या सभासदांची जागा मध्येच रिकामी झाल्यास कार्यकारी मंडळाने सभासद स्वीकृत करून ती जागा भरावी. अशा रितीने निवडलेल्या सभासदांची मुदत मूळ सभासदाच्या मुदतीइतकी राहील.

7) सात दिवसांच्या पूर्वसूचनेने अध्यक्ष किंवा कोणताही कार्यवाह किंवा कार्यकारी मंडळाचे अन्य पाच सदस्य कार्यकारी मंडळाची सभा बोलवू शकतील. वार्षिक सर्वसाधारण सभा समाप्त झाल्यानंतर नव्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा होईल व या सभेस पूर्वसूचनेची आवश्यकता राहणार नाही.

8) कार्यकारी मंडळाच्या सभेची गणसंख्या 8 (आठ) राहील.

9) परिषदेचे अध्यक्ष कार्यकारी मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. हे शक्य न झाल्यास कोणतेही उपाध्यक्ष अध्यक्षस्थान स्वीकारतील. हेही शक्य न झाल्यास सभा उपस्थित सभासदांतून आपला अध्यक्ष निवडील.

10) सर्व प्रश्नांवर सरळ मताधिक्याने कार्यकारी मंडळ निर्णय घेईल.

मते समान पडल्यास सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील.

11) कार्यकारी मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, कार्यकारिणी व सर्वसाधारण सभासदांच्या विशेष सभांत प्रत्येक संलग्न विभागाच्या फक्त एकाच पदाधिकाऱ्यास किंवा प्रतिनिधीस मतदानात भाग घेण्याचा अधिकार असेल. मात्र तसे विभागाच्या किमान दोन पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी (स्वत:शिवाय) असलेले अधिकारपत्र मतदानाच्या वेळी त्या प्रतिनिधींकडे असणे अनिवार्य असेल.

12) संलग्न विभागसंस्थांच्या प्रतिनिधींची मुदत वार्षिक सभा ते वार्षिक सभा अशी राहील. सभेअगोदरच्या 31 मार्च रोजी संलग्न असलेल्या व 30 एप्रिलपर्यंत चालू वर्षाची संस्था सभासदत्वाची वर्गणी भरलेल्या विभाग संस्थांना प्रतिनिधित्व मिळेल.

**कार्यकारी मंडळाचे अधिकार**

**9) कार्यकारी मंडळाची संरचना आणि अधिकार पुढीलप्रमाणे असतील :**

1) एकूण पाचपर्यंत उपाध्यक्ष असतील. त्यांतील परिषदेने तीन वर्षांसाठी निवडलेल्या बारा सभासदांपैकी दोन व तीन संलग्न विभागांचे प्रतिनिधी असतील (त्या वर्षीचे अधिवेशन असलेल्या विभागाचा एक; एका वर्षासाठी), त्या वर्षी उत्तम विभाग पुरस्कार प्राप्त विभागाचा एक; पुढील दोन वर्षांसाठी. तीनपर्यंत कार्यवाह व एक कोषाध्यक्ष यांची निवड करणे.

2) कार्यकारिणीच्या सभा वर्षातून दोनदाच होत असल्याने आणि वर्षाचे बारा महिने परिषदेचे काम सुरळीत चालू राहण्याच्या दृष्टीने स्थायी समिती नेमून त्यात कार्यकारिणीतील मुंबईचे व प्रत्यक्ष कार्यात सहभागी होऊ शकतील असे मुंबईतील इतर सभासद नेमणे. स्थायी समितीला कार्याच्या दृष्टीने कार्यकारिणीचे अधिकार दिले जातील. तरीही दोन कार्यकारिणी सभांच्या दरम्यान स्थायी समितीने घेतलेले निर्णय कार्यकारिणीच्या पुढील सभेत संमत करून घेणे.

3) कार्यकारी मंडळावर सभासद स्वीकृत करणे.

4) सभासदत्वाच्या अर्जावर निर्णय घेणे.

5) सभासदांनी पाठवलेल्या सूचनांचा विचार करणे व त्यावर

निर्णय घेणे.

6) परिषदेच्या घटना नियमांना बाधक ठरणार नाहीत अशी कार्यपद्धती ठरवणे, असलेल्या कार्यपद्धतीत बदल करणे, अशी कार्यपद्धती अस्तित्वात नसल्यास ती नव्याने तयार करणे. अशी कार्यपद्धती ठरली नसल्यास स्थायी समिती सभेच्या सूचनांनुसार निर्णय घेण्यात येईल.

7) परिषदेची वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभा बोलावणे.

8) वार्षिक सर्वसाधारण सभेला मागील वर्षाचा वृत्तान्त व हिशेब तपासनिसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे.

9) परिषदेसाठी वर्गण्या, देणग्या, अनुदाने, पारितोषिक निधी, बिनव्याजी ठेवी वगैरे मिळवणे.

10) कार्यालय, सभागृह अगर अन्य मिळकतीची वास्तू बांधणे, विकत घेणे, भाड्याने घेणे अथवा अन्य प्रकारे त्यांची सोय करणे. मात्र, स्थावर मालमत्ता घेण्यास राखीव निधीहून जास्त रक्कम खर्च होणार असल्यास किंवा कोणत्याही कारणासाठी परिषदेला कर्ज काढावे लागणार असल्यास त्यासाठी सर्वसाधारण सभेची संमती घ्यावी लागेल.

11) परिषदेसाठी अधिकारी, सल्लागार व कर्मचारी वर्ग नेमणे, शिस्तभंगाची कार्यवाही करणे व त्यांची वेतनश्रेणी ठरविणे यासाठी अध्यक्ष, तीन कार्यवाह व कोषाध्यक्ष यांना अधिकार देणे.

12) परिषदेच्या कार्याला आनुषंगिक असे कार्यक्रम करणे व परिषदेच्या कार्याला प्रसिद्धी देणे.

13) परिषदेच्या शाखा व समित्या नेमणे, त्यांच्या कार्यकक्षा व कार्याचे पोटनियम ठरविणे, त्यांना कार्यकारी मंडळाचे एक अगर अनेक अधिकार देणे आणि त्यांच्यावर देखरेख करणे.

14) परिषदेची मालमत्ता व कागदपत्रे यांची व्यवस्था ठेवणे.

15) परिषदेच्या साधनांचा उपयोग करणे व त्याचा योग्य अटीवर सभासदांना व इतरांना लाभ देणे.

16) विज्ञान अधिवेशनाचे नियम व कार्यक्रम ठरवणे, अधिवेशनाध्यक्षांची निवड करणे. अधिवेशनासाठी अन्य संस्थांचे

निमंत्रण स्वीकारणे व अधिवेशनात संमत झालेले ठराव शिफारसवजा मानून योग्य वाटल्यास त्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

17) नित्य पत्रव्यवहाराव्यतिरिक्त होणारे परिषदेचे इतर करारनामे, खतपत्रे वगैरे परिषदेला बंधनकारक करण्यासाठी त्यावर परिषदेची मुद्रा वापरण्यास व परिषदेच्या वतीने स्वाक्षरी करण्यास कार्यकारी मंडळाच्या दोन सदस्यांना अधिकार देणे. या दोन सदस्यांपैकी एक अध्यक्ष किंवा कोणताही कार्यवाह असला पाहिजे.

18) परिषदेच्या संलग्न विभागसंस्था स्थापन करण्यासाठी व त्यांची प्रगती करण्यासाठी प्रयत्न करणे. संलग्न विभागसंस्थांना मान्यता देणे व काढून घेणे.

19) बँकांमध्ये परिषदेची खाती उघडणे व तत्संबंधी वेळोवेळी योग्य ठराव करून योग्य त्या व्यक्तींना सदर खात्यासंबंधीचे अधिकार देणे.

20) परिषदेचे सन्मान्य सभासद नेमणे.

21) परिषदेच्या हिताच्या दृष्टीने इतर सर्व कार्य करणे.

**सर्वसाधारण सभा**

**10)** 1) परिषदेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा कार्यकारी मंडळाकडून बोलावली जाईल.

2) अध्यक्षांना किंवा कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटल्यास किंवा परिषदेच्या किमान 20 सभासदांनी लेखी मागणी केल्यास, तशी मागणी कार्यालयाकडे आल्यापासून दोन महिन्यांच्या आत, कार्यकारी मंडळ विशेष सर्वसाधारण सभा बोलावील. विशेष साधारण सभेत फक्त कार्यक्रम पत्रिकेवरील कार्याचाच विचार होईल. या सभेस किमान 20 सदस्यांची संख्या आवश्यक राहील.

3) सर्वसाधारण सभेची सूचना व कार्यक्रमपत्रिका सर्व सभासदांना किमान पंधरा दिवसांच्या पूर्वसूचनेने पाठवण्यात येतील. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेबरोबर वार्षिक वृत्तान्त, हिशेबपत्रके व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक परिषदेस योग्य व सुलभ वाटेल त्या पद्धतीने पाठवण्यात येतील आणि निवडणुकीची सूचना देण्यात येईल.

4) सर्वसाधारण सभा सामान्यतः मुंबईत भरेल. परंतु, विशिष्ट परिस्थितीत अशी सभा अन्यत्र घेण्याचा कार्यकारी मंडळाला

अधिकार राहील.

5) सर्वसाधारण सभेची गणसंख्या 20 राहील. गणसंख्येच्या अभावी वार्षिक सर्वसाधारण सभा 15 मिनिटे स्थगित होऊन पुन्हा त्याच ठिकाणी भरेल व या पुन्हा भरणाऱ्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. विशेष सर्वसाधारण सभा गणसंख्येच्या अभावी रद्द होईल.

6) परिषदेचे अध्यक्ष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. हे शक्य न झाल्यास कोणतेही उपाध्यक्ष अध्यक्षस्थान स्वीकारतील. हेही शक्य न झाल्यास सभा उपस्थित सभासदांतून आपला अध्यक्ष निवडील.

7) अविश्वासाचा ठराव, परिषदेच्या नियमांची दुरुस्ती, विश्वस्तास पदांवरून काढणे, परिषदेचे विसर्जन या विषयांखेरीज अन्य प्रश्नांवर सरळ मताधिक्याने सर्वसाधारण सभा निर्णय घेईल. मते समान पडल्यास सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील. मत देणारा मतदार सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या 31 मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरच्या 30 एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये.

8) वार्षिक वृत्तान्तासंबंधी व हिशेबासंबंधीचे प्रश्न सभेत विचारायचे झाल्यास सभेअगोदर किमान चार दिवस सभासदांनी परिषदेच्या कार्यालयाकडे ते लेखी पाठविले पाहिजेत.

**11) सर्वसाधारण सभेला पुढील अधिकार असतील.**

**सर्वसाधारण सभेचे अधिकार**

1) वार्षिक सर्वसाधारण सभेत मागील वार्षिक व विशेष साधारण सभांचे इतिवृत्त, वार्षिक वृत्तान्त, हिशेब व पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक संमत करणे व हिशेब तपासनीस नेमणे.

2) अध्यक्षांनी, कार्यकारी मंडळाने व सभासदांनी मांडलेल्या सूचनांवर निर्णय घेणे.

3) नियमांनुसार अध्यक्षांची, विश्वस्तांची व कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड करणे.

**पदाधिकारी**

**12)** 1) परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष हे पदाधिकारी मानले जातील. उपाध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष यांची मुदत वार्षिक सभा संपेपर्यंत राहील.

2) परिषदेतर्फे किंवा परिषदेविरुद्ध होणाऱ्या कायदेशीर कारवाया अध्यक्षांच्या नावे होतील.

3) कार्यवाहांनी अध्यक्षांच्या व उपाध्यक्षांच्या सल्ल्याने व कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार सर्व कार्य करावे. रोख 5000/- (पाच हजार) रुपयांपर्यंत अनामत रक्कम प्रत्येक कार्यवाह व कोषाध्यक्षांना आवश्यकतेनुसार स्वत:जवळ दोन महिने कालावधीसाठी ठेवता येईल. कार्यवाहांनी सर्वसाधारण सभांची व कार्यकारी मंडळाच्या सभांची इतिवृत्ते लिहून घेण्याची सोय करावी. परिषदेची मुद्रा व दप्तर यांचा सांभाळ करावा व पत्रव्यवहार करावा.

4) कोषाध्यक्षांनी हिशेब ठेवावेत व परिषदेतर्फे होणारे खर्च योग्य नियमांनुसार व ठरावानुसार होत आहेत याची खात्री करून घ्यावी. कोषाध्यक्षांची अगर कार्यकारी मंडळाने अधिकार दिलेल्या अन्य व्यक्तींची स्वाक्षरी असलेलीच पावती कायदेशीर समजली जाईल.

5) अनपेक्षित व आवश्यक कार्य उद्भवल्यास त्यासाठी रु. 50,000/- (पन्नास हजार ) पर्यंत खर्च मंजूर करण्याचा अधिकार अध्यक्षांना किंवा कार्यवाहांना राहील. अशा विशेष खर्चाची माहिती कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

**निवडणूका**

**13)** 1) दर तीन वर्षांनी अध्यक्षांची वार्षिक सर्वसाधारण सभेत पुढील तीन वर्षांसाठी निवडणूक होईल. अध्यक्षांची जागा काही कारणांनी मध्येच रिकामी झाल्यास पुढील वार्षिक सभेत अध्यक्षांची तीन वर्षांसाठी निवडणूक होईल. दरवर्षी कार्यकारी मंडळावरून निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडणूक होईल.

2) निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार व मत देणारा मतदार हा वार्षिक सभेअगोदरील 31 मार्च रोजी परिषदेचा सभासद असला पाहिजे व सभेअगोदरील 30 एप्रिल रोजी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये.

3) सूचक व अनुमोदकासह उमेदवाराचा लेखी अर्ज वार्षिक सभेपूर्वी चार दिवस कार्यालयाकडे पोहोचला पाहिजे. या अर्जाची छाननी कार्यवाह करतील व योग्य ठरलेले अर्ज कार्यालयात जाहीर करतील. उमेदवारास निवडणूक व्हायच्या एक दिवस आधी, दुपारी 12.00 वाजेपर्यंत निवडणुकीतून नाव मागे घेता येईल.

4) निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असले तर त्यांची बिनविरोध निवड होईल. निवडून द्यावयाच्या जागांहून जास्त उमेदवार असल्यास निवडणुका होतील. मतदानाचा अधिकार असलेले उपस्थित सभासद गुप्त मतदान पद्धतीने मते देतील. जितक्या जागा असतील, तितक्या किंवा कमी उमेदवारांना प्रत्येकी एक याप्रमाणे मत देण्याचा मतदाराला अधिकार राहील. समप्रमाणात मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल.

5) परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास निवडणुकीस उभे राहता येणार नाही.

6) स्थायी समितीने नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी व दोन साहाय्यक निवडणुकीची व्यवस्था बघतील. निवडणूक अधिकारी सभेस निर्णय सादर करतील व तो अंतिम मानला जाईल. निवडून आलेले उमेदवार सर्वसाधारण सभेनंतर कार्यकारी मंडळाचे सभासद मानले जातील.

7) निवडणूक अधिकारी मतदारांना मतपत्रिका देताना स्वत:ची स्वाक्षरी व परिषदेची मुद्रा मतपत्रिकेच्या मागील बाजूस उठवून मतपत्रिका मतदारास देतील.

8) निवडणुकीसंबंधी कुठलीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करून निवडणूक अधिकारी आपला निर्णय देतील व तो निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

9) निवडणूक संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी होईल.

10) मतमोजणी संपवून आपले लेखी निर्णय निवडणूक अधिकारी स्वाक्षरी करून सभेस सादर करतील व तो अंतिम मानला जाईल. निवडून आलेले उमेदवार सर्वसाधारण सभेनंतर कार्यकारी मंडळाचे सभासद मानले जातील.

**अविश्वासाचा ठराव**

**14)** एखाद्या सभासदाचे वर्तन परिषदेच्या हिताला बाधक आहे असे वाटल्यास सर्वसाधारण सभेला त्या सभासदाविरुद्ध उपस्थितांची किमान 2/3 मते मिळवून अविश्वासाचा ठराव संमत करता येईल. असा ठराव संमत झाल्यावर त्या सभासदाचे सभासदत्व रद्द होईल. अविश्वासाच्या ठरावाची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव संमत करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा असता कामा नये.

**नियम दुरुस्ती**

**15)** 1) परिषदेचे घटना नियम दुरुस्त करण्याचा सर्वसाधारण सभेला अधिकार राहील. परिषदेचे नाव किंवा उद्देश याव्यतिरिक्त अन्य घटना नियम दुरुस्त करावयाचे असल्यास दुरुस्तीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे व ठराव करणारी सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली नसली पाहिजे. उपस्थित सभासदांपैकी किमान 2/3 सभासदांनी सूचनेच्या किंवा सभेत मांडलेल्या उपसूचनांच्या बाजूने मत दिल्यास अशी सूचना व उपसूचना मंजूर होऊन त्यानुसार घटना नियम दुरुस्त होतील. असंमत झालेली सूचना निदान सहा महिने पुन्हा विचारार्थ घेतली जाणार नाही. नवीन घटना नियम करणे, जुने घटना नियम गाळणे किंवा बदलणे यांचा घटना नियम दुरुस्तीत अंतर्भाव होतो.

2) संस्थेचे नाव किंवा उद्देश बदलायचे झाल्यास त्याविषयीची सूचना संस्था नोंदणी अधिनियमांनुसार आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांनुसार संमत झाली, तरच त्या सूचनेनुसार नाव किंवा उद्देश यांत दुरुस्ती होईल.

**विसर्जन**

**16)** संस्था नोंदणी अधिनियमांनुसार व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांनुसार परिषदेच्या विसर्जनाची सूचना संमत झाल्यास परिषदेचे विसर्जन होईल. त्या वेळी असलेली परिषदेची स्थावर आणि जंगम मालमत्ता समान उद्देशाने काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा परिषदेची सर्व मालमत्ता सरकार जमा करण्यात येईल आणि त्यानंतर परिषदेचे विसर्जन होईल.

**17)** 1) परिषदेला मिळणाऱ्या सर्व देणग्या, वर्गण्या, अनुदाने व इतर सर्व उत्पन्न यांचा समावेश परिषदेच्या निधीत होईल. सर्वसाधारण सभेने संमती दिल्यास अन्य कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल.

**निधी व मालमत्ता**

2) आजीव सभासदांच्या वर्गणीचा किंवा कोणत्याही अटीवाचून मिळालेल्या द्रव्यरूपी देणग्यांचा शक्य तेवढा भाग व स्थावर मालमत्तेसाठीच मिळालेल्या देणग्यांचा मिळून एक राखीव निधी करण्यात येईल. त्याचा वापर स्थावर मालमत्ता घेण्यासाठी करण्यात येईल. सर्वसाधारण सभेने संमती दिल्यास अन्य कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल.

3) स्थावर मालमत्ता घेण्यासाठी मिळालेल्या देणग्या स्थावर मालमत्ता घेण्यासाठी / बांधकाम / स्थावर मालमत्तेच्या मोठ्या दुरुस्त्या / स्थावर मालमत्तेचे नुतनीकरण यांसाठीच वापरल्या जातील.

4) परिषदेच्या स्थावर व इतर मालमत्तेची व्यवस्था विश्वस्तांकडे व त्यांच्या परवानगीने कार्यकारी मंडळाकडे राहील.

**18)** 1) परिषदेच्या उद्देशांप्रमाणे उद्देश असलेल्या, मराठीतून विज्ञान प्रसार करणाऱ्या, लोकशाही पद्धतीनुसार सभासदत्व देणाऱ्या व कार्य करणाऱ्या ठिकठिकाणच्या संस्थांना परिषदेचा विभाग म्हणून संलग्न होता येईल.

**संलग्न विभाग संस्था सभासद**

2)अशा संस्थांचे नाव **मराठी विज्ञान परिषद....विभाग** असे राहील व... या ठिकाणी कार्यस्थान दर्शक शब्द राहील. उदा. मराठी विज्ञान परिषद ठाणे विभाग. येथे कार्यस्थान दर्शक शब्द ठेवणे बंधनकारक राहिल,

3) विभाग संस्थांनी संलग्नता वर्गणी म्हणून दरवर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या स्थायी समिती सभेत ठरलेल्या रकमेप्रमाणे त्या वर्षाच्या एप्रिल महिना अखेर पर्यंत मराठी विज्ञान परिषदेस रक्कम पाठवावी.

4) संलग्नता देण्याचा व काढण्याचा अधिकार परिषदेच्या कार्यकारी मंडळास राहील.

5) संलग्न विभाग संस्था व परिषद या कायदेशीर रितीने पूर्ण स्वायत्त

संस्था असतील, मात्र परस्परांशी सहकार्य करतील व शक्य ते साहाय्य परिषदेला देतील.

**विद्यार्थी सभासद**

**19)** 1) अठरा वर्षांहून कमी वय असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास परिषदेचे विद्यार्थी सभासद होता येईल.

2) विद्यार्थी सभासदांना सर्वसाधारण सभेत मतदान करण्याचा, कार्यकारी मंडळावर व अन्य अधिकृत स्थानांवर निवडून येण्याचा अधिकार असणार नाही.

3) विद्यार्थी सभासदत्वाची वर्गणी वार्षिक रुपये 50/- (पन्नास) राहील.

4) विद्यार्थी सभासदांना कार्यकारी मंडळ ठरवील त्यानुसार मुखपत्र, ग्रंथालय, कार्यक्रम इत्यादींचा लाभ घेता येईल.

**विश्वस्त सभासद**

**20)** 1) परिषदेचे विश्वस्त मंडळ असेल. त्यावर परिषदेच्या किमान पाच व कमाल सात आजीव व्यक्ती सभासदांची मतदानाने निवड होईल.

2) विश्वस्तांची निवडणूक सर्वसाधारण सभेत केली जाईल. यासंबंधीची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असायला हवी. सूचना व अनुमोदनासह उमेदवाराचा लेखी अर्ज सभेपूर्वी चार दिवस कार्यालयाकडे पोहोचला पाहिजे. या अर्जाची छाननी कार्यवाह करतील व योग्य ठरलेले अर्ज कार्यालयात जाहीर करतील व निवडणुकीच्या एक दिवस आधी दुपारी 12 वाजेपर्यंत निवडणुकीतून नाव मागे घेता येईल. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असले तर त्यांची बिनविरोध निवड होईल. निवडून द्यावयाच्या जागांहून जास्त उमेदवार असल्यास निवडणूक होईल. मतदानाचा अधिकार असलेले उपस्थित सभासद गुप्त मतदानपद्धतीने मते देतील जितक्या जागा असतील तितक्या किंवा कमी उमेदवारांना प्रत्येकी एक याप्रमाणे मत देण्याचा अधिकार मतदाराला राहील. समप्रमाणात मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल.

3) विश्वस्तांची कार्यमुदत पाच वर्षे राहील अथवा अध्यक्षांकडे राजीनामा देईपर्यंत विश्वस्त आपल्या पदांवर राहतील. तसेच, उपस्थितांची किमान 2/3 मते मिळाल्यास सर्वसाधारण सभेस कोणत्याही विश्वस्तास काढता येईल. मात्र, त्यासंबंधीची सूचना

सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असायला हवी. विश्वस्त निवडणूकीस परत उभे राहू शकतील.

4) परिषदेची स्थावर मालमत्ता व कार्यकारी मंडळाने केलेले विविध निधी विश्वस्तांच्या स्वाधीन राहतील.

5) विश्वस्तांच्या स्वाधीन असलेल्या मालमत्तेची व निधींची व्यवस्था विश्वस्तांकडे राहील व त्यांच्या परवानगीने ती कार्यकारी मंडळाकडे राहील.

6) विश्वस्तांचे अधिकार व कर्तव्ये यांसंबंधी सर्वसाधारण सभेला निर्णय घेता येईल व त्यानुसार कार्यकारी मंडळ विश्वस्तपत्र करील. विश्वस्त व कार्यकारी मंडळ यांत मतभेद निर्माण झाल्यास त्यावर सर्वसाधारण सभा निर्णय घेईल.

7) विश्वस्त मंडळास निधींची गुंतवणूक करता येईल. बँकेमध्ये खाती उघडता येतील व त्यासंबंधीचे अधिकार योग्य त्या व्यक्तीस देता येतील.

8) कार्यकारी मंडळाच्या सभांसाठी निरीक्षक म्हणून उपस्थित राहण्याचे विश्वस्त मंडळास निमंत्रण देण्यात येईल.

9) विश्वस्त मंडळ आपल्या सभांचे नियम ठरवतील, विश्वस्त मंडळ सभेचा अध्यक्ष नेमतील. विषयानुरुप आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या एका किंवा अधिक सभासदांची मदत घेतील.

10) विश्वस्त मंडळाच्या सभेस किमान तीन विश्वस्त उपस्थित असल्यास घेतलेले निर्णय ग्राह्य मानले जातील. अन्यथा असे निर्णय सर्व विश्वस्तांना मेलद्वारे / टपालाने पाठवून त्यास मान्यता घ्यावी. समान मते पडल्यास त्या विश्वस्त मंडळ सभेचे अध्यक्ष निर्णायक मत देतील.

**21)** 1) परिषदेचे सर्व व्यवहार प्रामुख्याने मराठीतून होतील.

**संकीर्ण**

2) परिषदेच्या वतीने व नियमांनुसार कार्य करणाऱ्या सभासदांना त्या कार्यामुळे कायदेशीर किंवा अन्य आक्षेप आल्यास व्यक्तिश: जबाबदार धरले जाणार नाही. कार्य करण्यासाठी केलेली त्यांची नेमणूक कायदेशीर नव्हती असे नंतर दिसले, तरी त्यांनी केलेले कार्य

कायदेशीर समजले जाईल.

3) सर्वसाधारण सभांची व कार्यकारी मंडळाच्या सभांची टिपणे पुढील सभेत वाचून संमत करण्यात येतील. टिपणे संमत करणाऱ्या सभेच्या अध्यक्षांनी स्वाक्षरी केल्यावर टिपणे संमत व बंधनकारक मानली जातील.

4) कोणत्याही सभेची सूचना चुकून किंवा पराधीन कारणांमुळे काही सभासदांना अजिबात अगर वेळेवर न पोहोचल्यास त्यामुळे त्या सभेचे कार्य बेकायदेशीर ठरणार नाही.

5) कोणत्याही प्रश्नावरील मतदान हस्तप्रदर्शनाने होईल; परंतु कोणत्याही सभासदाने अगोदर मागणी केल्यास मतदान गुप्त पद्धतीने होईल.

**प्रकाशक**
**डॉ. जयंत वसंत जोशी**
कार्यवाह
मराठी विज्ञान परिषद
विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई - 400 022.

**अक्षरजुळणी**
रेश्मा मासवकर

**मुद्रक**
**प्रयुष एन्टरप्रायझेस**, जुईनगर, नवी मुंबई 400 705.